0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-** १) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांचेकडून दिनांक १५/०९/२०११ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त झालेले कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६४/२०११/जा.८३४, दिनांक २०/१०/२०११, ०४/११/२०११, २४/११/२०११, ०८/१२/२०११ व २६/१२/२०११.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांचे दि.२०/१२/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.

४) विनोद विष्णू खानोलकर याचे दिनांक २०/१२/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

५) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांचे दिनांक ०९/०२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदना सोबतची रासायनिक पृथ:करण अहवालाची छायांकित प्रत.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६४/२०११/जा. १९५
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.

दिनांक : 30/०३/२०१२.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०६/०४/२०११ रोजी सहाय्यक पोलिस आयुक्त, फिरोज पटेल, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई व त्यांचे सहकारी यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, व्ही.के. ट्रेडिंग कंपनी, गोडावून नं. ७, रावजी सोजपाल कंपाऊंड, गोलंजी हिल रोड, शिवडी, मुंबई - १५ या कंपनीमध्ये ल्युब ऑईलमध्ये कोणतातरी रासायनिक पदार्थ भेसळ करुन सदरचे ऑईल ड्रममध्ये भरुन सदर ड्रमला एच.पी., इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम इत्यादी नामांकित कंपन्यांच्या नावाचे बनावट सिल लावून सदर ड्रममधील ऑईल हे नामांकित कंपन्यांचे व उच्च प्रतीचे ल्युब ऑईल असल्याचे भासवून त्याचा मोठ्या प्रमाणात गिऱ्हाईकांना विकण्यासाठी साठा करुन ठेवला असून त्यामुळे गिऱ्हाईकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे. तसेच संबंधित कंपन्यांचे आर्थिक नुकसान होत असून,

सदरचा व्यवसाय हा विनापरवाना केला जात आहे. तरी सदर ठिकाणी माहितीची खात्री करुन छापा टाकून कायदेशिर कारवाई करण्याकरिता नमूद घटनास्थळावर अंदाजे ११:४५ वाजताच्या सुमारास पोलिस पथकाने पंचासह गोडावूनमध्ये प्रवेश केला असता, गोडावूनमध्ये काही इसम २०० लिटर क्षमतेच्या भरलेल्या ऑईलच्या ड्रममधून ऑईल काढून ते मोकळ्या ड्रममध्ये टाकून त्यामध्ये कोणत्यातरी रासायनिक पदार्थ भेसळ करुन सदर ड्रममधील ऑईल दांड्याने हलवून मिश्रित करुन परत ते ऑईल दुसऱ्या ड्रममध्ये भरुन सदर ड्रमला नामांकित कंपनीचे सिल लावताना दिसून आले. सदर इसमांना त्यांची कृती थांबविण्यास सांगून त्यांना स्वत:ची व पथकातील अधिकारी/कर्मचारी तसेच पंचाची ओळख करुन दिली व येण्याचा उद्देश समजावून सांगितला. सदर इसमांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) बळवंत हनुमंत पवार २) दिपक नारायण पवार ३) लक्ष्मण गणेश मुळीक ४) विजयकुमार रामप्यारे राजभर ५) शंकर बाबुराव काटकर असे असल्याचे सांगितले.

सदर गोडावूनमधील माल कोणाच्या मालकीचा आहे, याबाबत विचारणा करता त्यांनी सदर मालाच्या मालकाचे नाव विनोद विष्णू खानोलकर हे असून कामानिमित्त बाहेर गेल्याचे सांगितले. सदर ऑईलमध्ये ते काय भेसळ करतात याबाबत उपस्थित इसमांना विश्वासात घेऊन विचारणा करता त्यांनी सांगितले की, ते ल्युब ऑईलमध्ये लाल रंगाचे रासायनिक द्रव्य व कार्बन तेल भेसळ करुन इंजिन ऑईल व मशिन ऑईल तयार करतात. तसेच सदर तयार केलेले ऑईल मागणी प्रमाणे वेगवेगळ्या क्षमतेच्या ड्रममध्ये भरुन त्यावर एच.पी., भारत पेट्रोलियम व इंडियन ऑईल या नामांकित कंपन्यांचे पत्र्याचे सिल लावून सदर तयार केलेला माल उच्च प्रतीचा आहे असे भासवून त्यांचे मालक गिऱ्हाईकांना विक्री करतात, असे सांगितले. सदर कारवाई सुरु असताना तीन इसम माल खरेदीसाठी आले असता, त्यांनी त्यांचे नाव १) मितेश चंदूलाल शहा २) परशुराम अनंत आंबेलकर ३) हितेश प्रवीणचंद्र शहा असे सांगितले. पोलिस पथकाने सदर इसमांची चौकशी करुन नंतर तपासकामी हजर राहण्याच्या सुचना दिल्या.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितानी संगनमत करुन त्यांचेकडे ल्युब ऑईल वर प्रक्रीया करण्याचा कोणताही कायदेशिर परवाना नसताना त्यांनी ल्युब ऑईलमध्ये कोणतातरी रासायनिक द्रव्य भेसळ करुन सदरचे ऑईल हे लोखंडी ड्रममध्ये भरुन त्या ड्रमला एच.पी., भारत पेट्रोलियम व इंडियन ऑईल या नामांकित कंपन्यांचे पत्र्याचे सिल लावून ड्रममधील हा कमी प्रतीचा असल्याचे माहित असून सुध्दा तो खरा व उच्च प्रतीचा आहे असे भासवून गिऱ्हाईकांना विकण्यासाठी साठा करुन ठेवला व गिऱ्हाईकांची फसवणूक केली व संबंधित नामांकित कंपन्यांचे आर्थिक नुकसान केले. पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्याची फसवणूक केल्याचे सिध्द होत

000



HEAD OFF MUMB

असल्याने संबंधितांविरुध्द [१] जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७(२) [२] दि ल्युब्रिकेटींग ऑईल ॲण्ड ग्रिसेस प्रोसेसिंग सप्लाय ॲण्ड रेडिस्ट्रीब्युशन ऑर्डर - १९८७ चे कलम ३, ४ [३] भा. द. वि. चे कलम ४२०, ३४ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द रफी अहमद किडवाई मार्ग पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १०३/२०११, दि.०६/०४/२०११ (गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ११/२०११) अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | १५० क्रमांकाच्या ल्युब ऑईलने भरलेले २०० लि. क्षमतेचे १० ड्रम | २००० लिटर | १,४०,०००/- |
| २ | ५०० क्रमांकाच्या ल्युब ऑईलने भरलेले २०० लि. क्षमतेचे २७ ड्रम | ५४०० लिटर | ४,३२,०००/- |
| ३ | १२, ७०, ९०, १४० क्रमांकाच्या ल्युब ऑईलने भरलेले २०० लिटर क्षमतेचे ४२ ड्रम | ८४०० लिटर | ६,७२,०००/- |
| ४ | ४० क्रमांकाच्या कटिंग ऑईलने भरलेले २०० लिटर क्षमतेचे ८ ड्रम | १,६०० लिटर | १,४४,०००/- |
| ५ | ऑईलमध्ये भेसळीसाठी लागणारा लाल रंग २०० लिटर क्षमतेच्या ड्रममध्ये ४० लिटर भरलेला | ४० लिटर | ८,०००/- |
| ६ | ऑईलमध्ये भेसळीसाठी लागणारे कार्बन तेल २०० लिटर क्षमतेच्या ड्रममध्ये १०० लिटर भरलेला | १०० लिटर | ३०,०००/- |
| ७ | ४४ क्रमांकाचे ग्रिसने भरलेले २०० किलो क्षमतेचे ५ ड्रम | १००० किलो | ९०,०००/- |
| ८ | एमपी २ या ग्रिसने भरलेले २०० किलो क्षमतेचे ४ ड्रम | ८०० किलो | ७२,०००/- |
| ९ | ल्युब ऑईलने भरलेले १७ लिटर क्षमतेचे पत्रा डबा नग ४९ | ८३३ लिटर | ५८,३१०/- |
| १० | ग्रीसने भरलेले १५ किलो वजनाचे २७ पत्रा डबे | ४०५ किलो | ३६,४५०/- |
| ११ | २०० लिटर क्षमतेचे २८७ रिकामे ड्रम लोखंडी पत्राचे | २८७ नग | १,१४,८००/- |
| १२ | भेसळयुक्त ल्युब ऑईलने भरलेला २०० लिटर क्षमतेचा एक ड्रम लीड मोकळे असलेला | २०० लिटर | १३,०००/- |
| १३ | भेसळीसाठी लागणारे व कार्यालयांत उपयोगाचे साहीत्य - पंचीग मशीन ४ नग, बॅरल खोलण्याचे पाने ४ नग, प्लॅस्टिक बादल्या ४ नग, नरसाळे ४ नग, हातपंप २ नग, स्प्रे पंप ४ नग, ४ नग विविध रंगाचे डबे, इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम व हिन्दुस्थान पेट्रोलियम या कंपन्याच्या नावाचे ड्रमला लावण्याचे छोटे पत्रा सिल ११६ नग, मोठे सिल ८० नग, कोरे पत्रा सिल २०० नग, जुने पत्रा सिल ६० नग, ऑईल ढवळण्याचा दांडा १ नग व इतर | - | २,००,०००/- |
| | | एकूण | २०,१०,५६०/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांनी वाचावे क्रमांक १ अन्वये केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्रमांक २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून रफी अहमद किडवाई मार्ग पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १०३/२०११, दि.०६/०४/२०११ (गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ११/२०११) मध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०१/११/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०१/११/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी अथवा आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दिनांक १८/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १८/११/२०११ रोजीच्या सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी अथवा आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दिनांक ०७/१२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी अथवा आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दिनांक २०/१२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २०/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबईचे तपासी पोलिस अधिकारी श्री. के. आर. सावंत उपस्थित राहिले व त्यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे वाचावे क्रमांक ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस जप्त मुद्देमालाचे मालक विनोद विष्णू खानोलकर हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्रमांक ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस शंकर बाबुराव काटकर, बळवंत हनुमंत पवार व दिपक नारायण पवार हे उपस्थित राहिले. परंतू त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले नाही. सुनावणीच्या दरम्यान जप्त मुद्देमालाचे मालक यांना नमूद गोदामाचे करारपत्र तसेच त्यांनी ल्युब ऑईलच्या अनुज्ञप्तीच्या अनुषंगाने त्यांचे साठा पुस्तक, खरेदी व विक्री बिले इत्यादी दस्ताऐवज सदर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०३/०१/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०३/०१/२०१२ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत.

प्रस्तूत प्रकरणी संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुरेशी संधी देवून देखील त्यांनी साठ्यासंबंधी आवश्यक पुरावादर्शक दस्ताऐवज सुनावणीस उपस्थित राहून सादर न केल्याने सदरचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे एकतर्फी निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

तथापी, प्रस्तूत प्रकरणी जप्त केलेल्या द्रवपदार्थाचा रासायनिक पृथ:करण अहवाल पोलिसांकडून प्राप्त न झाल्याने पृथ:करण अहवालाअभावी जप्त करण्यात आलेल्या द्रवपदार्थाच्या विल्हेवाटीचे आदेश या कार्यालयाचे स्तरावर प्रलंबित ठेवण्यात आले व पृथ:करण अहवाल सादर करण्याबाबत वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांना पत्र निर्गमित करण्यात आले.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांचे वाचावे क्रमांक ५ च्या पत्रान्वये रासायनिक पृथ:करण अहवाल या कार्यालयास सादर केला.

<u>युक्तीवाद</u> :-

दिनांक २०/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबईचे तपासी पोलिस अधिकारी श्री. के. आर. सावंत यांनी सादर केलेल्या वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे लेखी अभिवेदनात, आपल्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजावणीकामी या कार्यालयास प्राप्त झालेल्या होत्या. सबब, प्रतिवेधी क्र. १ ते ११ यांना जारी नोटीसची बजावणी करण्यात आली असून त्यांना सुनावणीस आपल्या कार्यालयात वेळेवर हजर राहण्याची समज देण्यात आलेली आहे. तसेच यातील प्रतिवेधी क्र. १ ते ११ यांना समज देवून जारी नोटीसच्या छायांकित प्रतिवरी स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या असून सदरची छायांकित प्रत सुलभतेसाठी सोबत जोडण्यात आलेली आहे. यातील जप्त मालाचे नमुने मा. रासायनिक विश्लेषण प्रयोगशाळा, कलिना, मुंबई यांना तपासणीकामी पाठविण्यात आलेले असून त्यांचा पृथ:करण्याचा अहवाल अद्यापपर्यंत प्रलंबित असून तो मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. सदरचा अहवाल प्राप्त होताच आपणास सादर करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे. यातील जप्त केलेल्या मालाची लवकरात लवकर विल्हेवाट लावण्याकामी आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक २०/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित जप्त मुद्देमालाचे मालक विनोद विष्णू खानोलकर यांनी युक्तीवाद केला की, गुन्हे शाखा नियंत्रण गुन्हा नोंद क्र. ११/२०११ (किडवाई मार्ग पोलिस ठाणे, गुन्हा नोंद क्र. १०३/२०११ दिनांक ०६/०४/२०११) अन्वये त्याचे व्हि.के. ट्रेडिंग कंपनी, ७ रावजी सोजपाल कंपाऊंड, गोलंजी

हिल रोड, शिवडी, मुंबई - १५ येथे छापा टाकून पोलिसांनी त्याच्या कंपनीतील ल्युब ऑईल, ग्रिस व इतर साहित्य जप्त केलेले होते. सदर बाबत त्याच्याकडे ल्युब लायसन्स तसेच स्टॉक लायसन्स, गुमास्ता लायसन्स असून सुध्दा त्याच्यावर कारवाई करण्यात आली. त्याने कोणताही प्रकारचे बेकायदेशिर काम केलेले नाही, त्याबाबत सबळ पुरावा मिळाल्यास त्याला योग्य ती शिक्षा द्यावी. सदर बाबत केमिकल रिपोर्ट मिळेपर्यंत त्याची विनंती मान्य करावी व त्याला योग्य तो न्याय मिळावा, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांनी दिनांक ०९/०२/२०१२ रोजी पत्रासोबत सादर केलेल्या रासायनिक पृथ:करण अहवालात, Exhibit Nos. 1, 2 and 4 contains lubricating oil and Exhibit No. 3 contains grease असे नमूद आहे.

<u>निष्कर्ष :-</u>

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ०६/०४/२०११ रोजी सहाय्यक पोलिस आयुक्त, फिरोज पटेल, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई व त्यांचे सहकारी यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, व्ही.के. ट्रेडिंग कंपनी, गोडाऊन नं. ७, रावजी सोजपाल कंपाऊंड, गोलंजी हिल रोड, शिवडी, मुंबई-१५ या कंपनीमध्ये ल्युब ऑईलमध्ये कोणतातरी रासायनिक पदार्थ भेसळ करुन सदरचे ऑईल ड्रममध्ये भरुन सदर ड्रमला एच.पी., इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम इत्यादी नामांकित कंपन्यांच्या नावाचे बनावट सिल लावून सदर ड्रममधील ऑईल हे नामांकित कंपन्यांचे व उच्च प्रतीचे ल्युब ऑईल असल्याचे भासवून त्याचा मोठ्या प्रमाणात गिऱ्हाईकांना विकण्यासाठी साठा करुन ठेवला असून त्यामुळे गिऱ्हाईकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे. तसेच संबंधित कंपन्यांचे आर्थिक नुकसान होत असून, सदरचा व्यवसाय हा विनापरवाना केला जात आहे. तरी सदर ठिकाणी माहितीची खात्री करुन छापा टाकून कायदेशिर कारवाई करण्याकरिता नमूद घटनास्थळावर अंदाजे ११:४५ वाजताच्या सुमारास पोलिस पथकाने पंचासह गोडावूनमध्ये प्रवेश केला असता, गोडावूनमध्ये काही इसम २०० लिटर क्षमतेच्या भरलेल्या ऑईलच्या ड्रममधून ऑईल काढून ते मोकळ्या ड्रममध्ये टाकून त्यामध्ये कोणत्यातरी रासायनिक पदार्थ भेसळ करुन सदर ड्रममधील ऑईल दांड्याने हलवून मिश्रित करुन परत ते ऑईल दुसऱ्या ड्रममध्ये भरुन सदर ड्रमला नामांकित

कंपनीचे सिल लावताना दिसून आले. सदर इसमांना त्यांची कृती थांबविण्यास सांगून त्यांना स्वत:ची व पथकातील अधिकारी/कर्मचारी तसेच पंचाची ओळख करुन दिली व येण्याचा उद्देश समजावून सांगितला. सदर इसमांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) बळवंत हनुमंत पवार २) दिपक नारायण पवार ३) लक्ष्मण गणेश मुळीक ४) विजयकुमार रामप्पारे राजभर ५) शंकर बाबुराव कारटकर असे असल्याचे सांगितले. सदर गोडावूनमधील माल कोणाच्या मालकीचा आहे, याबाबत विचारणा करता त्यांनी सदर मालाच्या मालकाचे नाव विनोद विष्णू खानोलकर हे असून कामानिमित्त बाहेर गेल्याचे सांगितले. सदर ऑईलमध्ये ते काय भेसळ करतात याबाबत उपस्थित इसमांना विश्वासात घेऊन विचारणा करता त्यांनी सांगितले की, ते ल्युब ऑईलमध्ये लाल रंगाचे रासायनिक द्रव्य व कार्बन तेल भेसळ करुन इंजिन ऑईल व मशिन ऑईल तयार करतात. तसेच सदर तयार केलेले ऑईल मागणी प्रमाणे वेगवेगळ्या क्षमतेच्या ड्रममध्ये भरुन त्यावर एच.पी., भारत पेट्रोलियम व इंडियन ऑईल या नामांकित कंपन्याचे पत्र्याचे सिल लावून सदर तयार केलेला माल उच्च प्रतीचा आहे असे भासवून त्यांचे मालक गिऱ्हाईकांना विक्री करतात, असे सांगितले. सदर कारवाई सुरु असताना तीन इसम माल खरेदीसाठी आले असता, त्यांनी त्यांचे नाव १) मितेश चंदूलाल शहा २) परशुराम अनंत आंबेलकर ३) हितेश प्रवीणचंद्र शहा असे सांगितले. पोलिस पथकाने सदर इसमांची चौकशी करुन नंतर तपासकामी हजर राहण्याच्या सुचना दिल्या. यावरुन ल्युब ऑईलने भरलेले ड्रम, ऑईलमध्ये भेसळीसाठी लागणारे कार्बन तेल, ग्रिसने भरलेले ड्रम व इतर साहित्य यांचा साठा जप्त करुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

उपरोक्त नमूद गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला साठ्याचे मालक व इतर हे दिनांक ०१/११/२०११, १८/११/२०११ व ०७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. तद्नंतर दिनांक २०/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस जप्त मुद्देमालाचे मालक विनोद विष्णू खानोलकर यांनी उपस्थित राहून केलेल्या खुलाशात, त्यांच्याकडे ल्युब लायसंन्स, स्टॉक लायसंन्स व गुमास्ता लायसंन्स असून सुध्दा त्यांच्यावर कारवाई करण्यात आल्याचे सांगून निवेदनासोबत त्यांनी ल्युब्रिकेटिंग ऑईल व ग्रीस याच्या व्यवसायाकरिता उद्योग सहसंचालक यांनी दिनांक ११/०९/२०१० रोजी निर्गमित केलेला दुय्यम परवाना क्रमांक जेडीआय/एमएमआर/ल्युब ऑईल ॲण्ड ग्रीस ऑर्डर १९८७/००१५/२००५ दिनांक १२/०९/२००५ रोजीची छायांकित प्रत सादर केली व या व्यतिरिक्त कोणताही आवश्यक परवान्यांची प्रत सादर केली नाही. सदर परवाना मे. व्ही. के. ट्रेडिंग कंपनी या नावे असून सदर व्यवसायाकरिता सप्लायरची नांवे म्हणून मे. चंदूलाल टी. पारेख, मे. इर्स्टन एन्टरप्रायझेस व मे. पेट्रोकेम एन्टरप्रायझेस असे नमूद आहे. सदर परवान्याचे अवलोकन केले असता, सदरचा परवाना मे. व्ही. के. ट्रेडिंग कंपनी

यांना महानगरपालिका व इतर संबंधित प्राधिकरणाकडून आवश्यक परवाना घेण्याच्या अधिन राहून दिल्याचे तसेच सदरचा व्यवसाय करताना परवानाधारक उत्पादकानीच उत्पादन केलेल्या साठ्याचा व्यवसाय करण्यास अनुमती दिल्याचे नमूद आहे. विनोद विष्णू खानोलकर यांनी सदर सुनावणीस नमूद गोदामाचे करारपत्र, ल्युब ऑईल अॅण्ड ग्रिसेस ऑर्डर, १९८७ च्या अनुज्ञप्तीमधील अटीनुसार साठापुस्तक, साठा खरेदी व विक्री बिले इत्यादी आवश्यक दस्ताऐवज सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. त्यानुसार त्यांना व इतर संबंधीतांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी व आवश्यक पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक ०३/०१/२०१२ रोजी ठेवण्यात आली. तथापी, दिनांक ०३/०१/२०१२ रोजीच्या अंतीम सुनावणीस कोणीही उपस्थित राहिले नाहीत. यावरुन जप्त मुद्देमालाचे मालक तसेच आरोपी/अपचारी यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील त्यांनी सुनावणीस उपस्थित राहून आवश्यक पुरावादर्शक दस्ताऐवज सादर केले नाही. यावरुन आरोपी/अपचारी आणि जप्त मुद्देमालाचे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते.

धाडीच्या वेळी पोलिस पथकाने पंचासह गोडावूनमध्ये प्रवेश केला असता, गोडावूनमध्ये काही इसम २०० लिटर क्षमतेच्या भरलेल्या ऑईलच्या ड्रममधून ऑईल काढून ते मोकळ्या ड्रममध्ये टाकून त्यामध्ये कोणत्यातरी रासायनिक पदार्थ भेसळ करुन सदर ड्रममधील ऑईल दांड्याने हलवून मिश्रित करुन परत ते ऑईल दुसऱ्या ड्रममध्ये भरुन सदर ड्रमला नामांकित कंपनीचे सिल लावताना दिसून आले. तसेच पोलिसांनी घटनास्थळी उपस्थित इसमांना विचारणा केली असता, त्यांनी सदर ल्युब ऑईलमध्ये लाल रंगाचे रासायनिक द्रव्य व कार्बन तेल भेसळ करुन इंजिन ऑईल व मशिन ऑईल तयार करतात. तसेच सदर तयार केलेले ऑईल मागणी प्रमाणे वेगवेगळ्या क्षमतेच्या ड्रममध्ये भरुन त्यावर एच.पी., भारत पेट्रोलियम व इंडियन ऑईल या नामांकित कंपन्यांचे पत्र्याचे सिल लावून सदर तयार केलेला माल उच्च प्रतीचा आहे असे भासवून त्यांचे मालक गिऱ्हाईकांना विक्री करतात, असे सांगितले. तसेच घटनास्थळी पोलिसांनी इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम व हिन्दुस्थान पेट्रोलियम या भारतीय सरकारचे उपक्रम असलेल्या कंपन्यांच्या नावाचे ड्रमला लावण्याचे ११६ नग छोटे पत्रा सिल, ८० नग मोठे सिल, २०० नग कोरे पत्रा सिल व ६० नग जुने पत्रा सिल जप्त केले आहेत. म्हणजेच जप्त साठ्याचे मालक व घटनास्थळी उपस्थित इसम हे संगणमताने गैरमार्गाने विनाखरेदी बिलांचा ल्युब्रिकेटिंग ऑईल व ग्रीसचा साठा खरेदी करुन ड्रममध्ये भरुन त्यावर नामांकित कंपन्यांचे सिल लावून नफेखोरीच्या उद्देशाने अवैध व्यवसाय करीत असल्याचे

निष्पन्न झाले आहे. सबब, प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये रफी अहमद किडवाई मार्ग पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १०३/२०११, दि.०६/०४/२०११ (गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ११/२०११) मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u> :-**

१) जप्त करण्यात आलेल्या २०० लिटर क्षमतेच्या ८० ड्रममधील १६००० लिटर ल्युब ऑईल, १७ लिटर क्षमतेच्या ४९ पत्रा डब्यांमधील ८३३ लिटर ल्युब ऑईल, २०० लिटर क्षमतेच्या ८ ड्रममधील १६०० लिटर कटिंग ऑईल, २०० लिटर क्षमतेच्या १ ड्रममधील ऑईलमध्ये भेसळीसाठी लागणारा ४० लिटर लाल रंग, २०० लिटर क्षमतेच्या १ ड्रममधील ऑईलमध्ये भेसळीसाठी लागणारे १०० लिटर कार्बन तेल, २०० लिटर क्षमतेच्या ९ ड्रममधील १८०० किलो ग्रिस, १५ किलो क्षमतेचे २७ पत्रा डब्यांमधील ४०५ किलो ग्रिसचा साठा हा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेला सदरचा संपूर्ण साठा पोलिसांनी प्रचलित दराने वैध परवानाधारकास विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) २०० लिटर क्षमतेचे ३८६ रिकामे ड्रम, १७ लिटर क्षमतेचे ४९ रिकामे पत्रा डबा, १५ किलो क्षमतेचे २७ रिकामे पत्रा डबा, पंचीग मशीन ४ नग, बॅरल खोलण्याचे पाने ४ नग, प्लॅस्टिक बादल्या ४ नग, नरसाळे ४ नग, हातपंप २ नग, स्प्रे पंप ४ नग, ४ नग विविध रंगाचे डबे, इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम व हिन्दुस्थान पेट्रोलियम या कंपन्याच्या नावाचे ड्रमला लावण्याचे छोटे पत्रा सिल ११६ नग, मोठे सिल ८० नग, कोरे पत्रा सिल २०० नग, जुने पत्रा सिल ६० नग, ऑईल ढवळण्याचा दांडा १ नग इ. वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिकठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

प्रति,

१) बळवंत हनुमंत पवार
२) दिपक नारायण पवार
३) लक्ष्मण गणेश मुळीक
४) विजयकुमार रामप्यारे राजभर
५) शंकर बाबुराव काटकर
६) विनोद विष्णू खानोलकर, जप्त मुद्देमालाचे मालक
७) मितेश चंदूलाल शहा, मालाचे खरेदीदार
८) परशुराम अनंत आंबेलकर, मालाचे खरेदीदार
९) हितेश प्रवीणचंद्र शहा, मालाचे खरेदीदार
१०) गोडावूनचे मालक
११) ल्युब ऑईलचा पुरवठादार

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

~~३) निवड नस्ती.~~

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

0010